JANUARY 2026

नवीन वर्ष... नवी उमेद...नवा विश्वास...

# SAMARPAN

Muilti Disability Rehab Centre Dhule

## MONTHLY REPORT



ओळख

तुम्हाला माहिती आहे का ?

विशेष दिन

प्रेरणादायी कथा

महत्त्वाची पुस्तके

महिन्यातील आकडेवारी

सेवा दान

सामाजिक उपक्रम

For More Information at
www.samarpanrehab.org

# ओळख

ओळख





समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावं, हीच खरी सामाजिक प्रगतीची खूण आहे. प्रत्येक मुलांमध्ये मध्ये असलेल्या क्षमतेची, गरजेची आणि हक्कांची जाणीव समाजाला असावी, ही काळाची गरज बनली आहे. याच विचारातून 'समर्पण मल्टी-डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर' ची संकल्पना उभी राहिली. धुळे शहरात प्रथमच अशा प्रकारचे केंद्र सुरू आहे. जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच बहुविकलांग मुलांसाठी सर्वसमावेशक सेवा एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहे.

या केंद्रामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणांची सोय, अनुभवी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, तसेच प्रशिक्षित थेरपिस्ट्स व पुनर्वसन तज्ज्ञांचे मार्गदर्शन आहे. येथे फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, मानसोपचार सेवा, समुपदेशन, डे-केअर सेवा आणि शैक्षणिक मार्गदर्शन अशा विविध उपचार व सहाय्यक सेवा एकाच छताखाली दिल्या जातात. यामुळे गरजू मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना एकात्मिक आणि सातत्यपूर्ण उपचारपद्धतीचा लाभ मिळत आहे.

'समर्पण' केंद्र केवळ उपचार देणारे स्थळ नाही, तर समावेशक समाज घडवणारी एक चळवळ आहे. इथे दिव्यांग मुलांना केवळ मदत मिळत नाही, तर त्यांच्यात आत्मभान, आत्मविश्वास आणि समाजात स्वतःचं स्थान निर्माण करण्याची प्रेरणा दिली जाते. त्यांच्या विकासाच्या प्रवासात त्यांचे कुटुंबही सक्रिय सहभागी व्हावे यासाठी पालकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरेही आयोजित करण्यात येत असतात.

हे केंद्र म्हणजे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. समतेची भावना, समजूतदार दृष्टिकोन आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचा संगम म्हणजेच 'समर्पण'. या केंद्राच्या माध्यमातून आपण एक समावेशक, संवेदनशील आणि सशक्त समाज उभा करण्याच्या दिशेने निश्चितच पुढे जात आहोत.

## सुविधा

- पेडियाट्रिक न्युरोलॉजिस्ट
- फिजिओथेरपिस्ट
- ऑक्युपेशनल थेरपिस्ट
- स्पीच थेरपिस्ट
- सायकोलॉजिस्ट
- स्पेशल एज्युकेशन
- मानसशास्त्रीय ( IQ टेस्ट )
- पालक समुपदेशन
- ऑडिओमेट्रि & BERA
- EEG
- व्हर्च्युअल रिऍलिटी



Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation
Rotaract Club of Dhulia
Rotary Club of Dhulia
MATRUSEVA SANGH TRUST
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Vidya Vikas Child Neuroclinic

आकडेवारी

# जानेवारी महिन्यातील आकडेवारी

## खाली दिलेली संख्या ही जानेवारी महिन्यात वेगवेगळया विभागांनी तपासलेल्या रुग्णांची एकूण माहिती दर्शवते.

| विभाग | बीपीएल सेशन्सची संख्या | नॉन बीपीएल सेशन्सची संख्या | पॅकेज | एकूण सेशन्स |
|---|---|---|---|---|
| फिजिओथेरपी | 117 | 28 | 38 | 183 |
| ऑक्युपेशनल थेरपी | 47 | 34 | 130 | 211 |
| स्पीच थेरपी | 24 | 18 | 30 | 72 |
| पालकांचे समुपदेशन | 1 | 0 | 0 | 1 |
| विशेष शिक्षण | 56 | 17 | 112 | 185 |
| एडीएचडी चाचणी | 1 | 2 | 0 | 3 |
| ऑटिज्म चाचणी | 1 | 4 | 0 | 5 |
| आय क्यू चाचणी | 0 | 4 | 0 | 4 |
| एल डी चाचणी | 0 | 1 | 0 | 1 |
| एकूण एकत्र सेशन्स | **247** | **108** | **310** | **665** |



# जन्मताच दिव्यांग, जिद्दीने केले शिक्षण पूर्ण, बँकेत नोकरी करणाऱ्या मोनिकाची प्रेरणादायी कहाणी

सांगलीच्या वाळवा तालुक्यातील ओझर्डे या लहानशा खेड्यात गेल्या अनेक पिढ्यांपासून लोहार कुटुंब राहते. जिद्द आणि कष्टाचा वारसा लाभलेल्या याच लोहार कुटुंबात मोनिका यांचा जन्म झाला. मोनिका कुटुंबातील पहिलीच लेक. लेकीच्या जन्माने आई-वडिलांसह कुटुंब आनंदी झाले. परंतु काहीच दिवसात आपले बाळ खुब्यापासून दिव्यांग असल्याचे त्यांना समजले.पुढे अनेक दवाखाने आणि डॉक्टरांचे सल्ले घेतले. यातून मोनिकाला कमकुवत आणि ठिसूळ हाडांचे दिव्यांगत्व असल्याचे स्पष्ट झाले. शिवाय कमकुवत हाडे असल्याने वारंवार फ्रॅक्चर होत होते. डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार आणि वेळोवेळी ऑपरेशन्स करून देखील उभे राहण्याइतके साधे दुखणे नव्हते. ऑस्टियोजेनेसिस इम्परफेक्टा (OI) या आजारामुळे मोनिका कधीच स्वतःच्या पायावर उभी राहू शकणार नव्हती. परंतु लहानपणापासूनच अभ्यासाची आवड आणि घरच्यांनी निर्माण केलेल्या आत्मविश्वासाच्या बळावर मोनिका आर्थिकदृष्ट्या मात्र स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभी राहिली.

## जिद्दीने केले शिक्षण पूर्ण

मोनिकाने एम्.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. ऊन-वारा-पाऊस कशाचीही परवा न करता काकांनी शाळेच्या बेंचपर्यंत पोहोचवले. कामांमुळेच शिक्षण पूर्ण केल्याचे मोनिका कृतज्ञतेने सांगते. मोनिकाचे आई-वडील, काका-काकू शिक्षणाचे महत्त्व पहिल्यापासूनच जाणत होते. अशातच मुलीला असलेली अभ्यासाची आवड त्यांनी ओळखली. आणि दररोज नव्या संकटाचा जिद्दीने सामना करत मुलीचे शिक्षण पूर्ण केले.






## सांगली जिल्हा बँकेत नोकरी

सन 2018 हे मोनिकाच्या आयुष्याला कलाटणी देणारे वर्ष ठरले. 2018 ला मोनिका जी.डी.सी. परीक्षा उत्तीर्ण झाली. आणि 2019 सालापासून सांगली जिल्हा बँकेमध्ये क्लर्क पदावर सेवा बजावत आहे. गेल्या सहा वर्षांपासून राहत्या गावामध्ये सांगली जिल्हा बँकेच्या ओझर्डे शाखेमध्ये ती कार्यरत आहे. मोनिका दिव्यांग असली तरी तिने बँक सेवेतील आवश्यक प्रत्येक कौशल्य आत्मसात केले आहे. तिच्यामध्ये क्लर्क पदावरील कामाची तत्परता आणि उत्साह नेहमी जाणवत असल्याचे बँकेतील सहकारी सांगतात.

## जगण्याचे बळ

मोनिकाची हाडे ठिसूळ असल्याने वारंवार फ्रॅक्चर्स होत होते. शालेय वयात दोन-चार महिन्याला नवे फ्रॅक्चर्स होत असल्याने शाळेत कमी आणि हॉस्पिटलच्या बेडवर अधिक काळ घालवल्याचे वेदनादायी प्रसंग मोनिकाने सोसले. अशा कठीण प्रसंगी नव्या उमेदीने जगण्याची प्रेरणा आणि आत्मविश्वास वडिलांनी निर्माण केल्याचे मोनिका अभिमानाने सांगते. निसर्गाने आपल्याला काय कमी दिले याचा विचार करून दुःख करण्यापेक्षा; निसर्गाने जे दिले आहे त्याचा वापर करून आयुष्य शक्य तितके सुखी आणि समाधानी जगण्याचा प्रयत्न करते असे मोनिका आवर्जून सांगते.



Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic

**तुम्हाला माहिती आहे का ?**

# लहान मुलांचे दिव्यांग म्हणजे काय ?

जन्मतः किंवा लहान वयात येणारी अशी शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनात्मक अडचण जी मुलांच्या वाढीवर, शिकण्यावर, चालण्यावर, बोलण्यावर किंवा दैनंदिन जीवनावर परिणाम करते, त्याला बाल दिव्यांगत्व म्हणतात.

### 1 शारीरिक दिव्यांग

- हात-पाय कमजोर असणे
- चालायला उशीर / लंगडणे
- सेरेब्रल पाल्सी (Cerebral Palsy)

### 2 बौद्धिक दिव्यांग

- शिकण्यात खूप अडचण
- वयाच्या मानाने समज कमी असणे
- स्मरणशक्ती कमी

### 3 ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर

- डोळ्यात डोळे न पाहणे
- नावाने हाक मारली तरी प्रतिसाद न देणे
- एकाच गोष्टीची सतत पुनरावृत्ती

### 4 श्रवण दिव्यांग

- आवाजाकडे प्रतिसाद न देणे
- बोलायला उशीर होणे

### 5 दृष्टिदोष (Visual Impairment)

- वस्तू फार जवळ नेऊन पाहणे
- डोळे चोळणे / भिंतीवर आदळणे

### 6 बोलण्याचा व भाषा विकासाचा अडथळा

- 2 वर्षांपर्यंत शब्द न बोलणे
- अस्पष्ट किंवा अडखळत बोलणे

## पालकांनी लक्ष द्यावयाची धोक्याची चिन्हे

- 6 महिन्यांत मान नीट न धरता येणे
- 1 वर्षात बसता न येणे
- 2 वर्षात चालता न येणे
- बोलण्यास खूप उशीर
- सतत चिडचिड / एकटेपणा
- खेळात रस नसणे

**ही लक्षणे दिसल्यास त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.**

## उपचार आणि थेरपी

फिजिओथेरपी
ऑक्युपेशनल थेरपी
स्पीच थेरपी
स्पेशल एज्युकेशन
मानसोपचार व समुपदेशन

**दिव्यांगत्व हा आजार नाही, ती एक वेगळी क्षमता आहे.**
**योग्य वेळेस उपचार, थेरपी आणि पालकांचे प्रेम मिळाले तर लहान मुले स्वावलंबी आणि आत्मविश्वासी बनू शकतात**

# धुळे शहरातील सर्वात मोठ्या व बहुप्रतिक्षित ROVER BUILDCON 2026

धुळे शहरातील सर्वात मोठ्या व बहुप्रतिक्षित ROVER BUILDCON 2026 या भव्य प्रदर्शनामध्ये समर्पण मल्टी डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर, धुळे यांचा स्वतंत्र आणि अर्थपूर्ण स्टॉल उपस्थित होता. हा स्टॉल स्टॉल क्रमांक P63 व P64 येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला होता. या माध्यमातून दिव्यांग मुले, विशेष गरजा असलेली बालके तसेच त्यांच्या पालकांसाठी समर्पण संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती देण्यात आली. फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, विशेष शिक्षण, मानसिक आरोग्य सेवा आदी विविध पुनर्वसन सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनेक पालकांनी आपल्या मुलांच्या समस्यांबाबत थेट तज्ज्ञांशी संवाद साधला. समाजात दिव्यांगतेबाबत जनजागृती करणे, गैरसमज दूर करणे आणि योग्य वेळी उपचार किती महत्त्वाचे आहेत हे समजावून सांगणे हा या स्टॉलचा मुख्य उद्देश होता. समर्पणच्या सामाजिक उपक्रमांना मिळणारा सकारात्मक प्रतिसाद हा प्रेरणादायी ठरला. या प्रदर्शनाच्या निमित्ताने समर्पणचे कार्य अधिक व्यापक लोकांपर्यंत पोहोचले आणि समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकत्र येण्याचा संदेश देण्यात आला.















Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic

सेवा दान

# सेवेच्या या पवित्र कार्यात पवित्र कार्यात सहभागी होऊया...

## चला, भावी पिढीसाठी सर्व समावेशक समाज निर्माण करण्यासाठी आजच योगदान ...

प्रत्येक मुलाला सन्मानाने,
आत्मविश्वासाने आणि समान संधींसह जगण्याचा हक्क आहे.
दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊ या
समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.

QR कोड स्कॅन करून
आपण देणगी देऊ शकता...



**दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊया**
**समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.**

For More Information at
www.samarpanrehab.org

Samarpan
Multi Disability Rehab Center
सक्षमतेकडून स्वावलंबनाकडे प्रवास

## Partner Organisation

Rotaract Club of Dhulia District-3060

Rotary Club of Dhulia District-3060

MATRUSEVA SANGH TRUST F-8 DHULE

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Vidya Vikas Child Neuroclinic

## CSR Partners

SBI The banker to every Indian

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

NITIRAJ ENGINEERS LTD.

360 ONE Foundation®

## Digital Partner

**Saikala Bahuuddeshiya Sanstha, Dhule**

SAIKALA BAHUDDESHIY SANSTHA




समर्पण मल्टी डिसएबिलिटी रिहॅब सेंटर,
कस्तुरबा हॉस्पिटल,मुख्य टपाल कार्यालयासमोर,
टॉवर बाग शेजारी, धुळे - ४२४००१

8010895177 | 02562236182 | 02562313903

www.samarpanrehab.org

samarpan.mdrc@gmail.com

Follow Us
samarpan_rehab_dhule


**समर्पणसोबत आशेचा नवा प्रवास !**